महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यापीठ मार्ग, शिवाजी नगर, पुणे ४०११०१६

फोन : ०२०-२५६७६८१८, २५५५९२००

Email: principal.gppune@dtemaharashtra.gov.in


निविदा नोटीस क्र. जा.क्रं./शां.तनिपु/भांडार/२०२३/2291 दि. 31 MAY 2023

## निविदा नोटीस

**कामाचे नाव – शासकीय तंत्र निकेतन, पुणे ४११०१६ या संस्थेच्या सर्व जमिनींवरील कचरा उचलून त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावणे.**

या कामासाठीच्या सर्व अटी व शर्ती यांचा अभ्यास करुन तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन कामाचा आवाका (Scope) जाणून घेऊन अनुभवी ठेकेदारांनी विहित नमुन्यातील पत्रामध्ये त्यांचे दर खाली सही करणा-यांचे नावे या कार्यालयास दि. 12/06/2023 दुपारी ३.०० वाजता पोहोचतील अशा प्रकारे बंद पाकीटात सादर करावेत.

**नियम व अट**

(1) विषयांकीत कामांतर्गत परिसर – वर्णन

(i) शासकीय तंत्र निकेतन पुणे मुख्य इमारत व इतर इमारती, मुलांचे वसतीगृह, कचरा अंदाजे १०० मी. cub.

(ii) मुलींचे वसतीगृह, मैदान, कचरा अंदाजे १५ मी. cub.

(iii)अणूविद्युत व दुरसंचार इमारत परिसर,वर्ग४ निवासस्थान परिसर, कचरा अंदाजे १५ मी.cub.

(iv) शासकीय दूरशिक्षण, तंत्रनिकेतन परिसर. कचरा अंदाजे २० मी. cub.

2) सदर कामासाठी ठेकेदाराने वरील चार पैकी प्रत्येक परीसरासाठी. एकवट (Lump Sum) रक्कम (सर्व करांसहीत) Quote केली पाहिजे.

3) उपरोक्त सर्व परिसरांमधील घनकचरा, आहे त्या स्थितीत अंदाजे १५० घनमीटर आहे. अनुभवी कंत्राटदारांनी सर्व परिसराची पाहणी करुन कामाचा आवाका (Scope) पाहून निविदा र रक्कम भरावी.

4) सर्व परिसरांमध्ये सेंद्रिय कचरा, सुका कचरा बहुतांश एकत्रित झालेला आहे (Mixed Solid) ठेकेदाराने कच-याचे वर्गीकरण करुन (Segregation)पुणे महानगरपालिकेच्या नियमानुसार विल्हेवाट लावणेची आहे.

5) या कामाची निविदा काढण्याचा उद्देश उपनिर्दिष्ठ परिसरात साठलेल्या कच-याचे (Segregation) करुन, कच-याची वाहतूक करुन प्रचलित नियम व कायदयानुसार विल्हेवाट लावणे.

परिसर स्वच्छ करणे.

6) उपरिनिर्दिष्ट परिसरामधील कच-याचे वर्गीकरण करुन विलग करणे (Segregation) सदर Segregate केलेला कचरा नियमानुसार योग्य ठिकाणी वाहतूक करुन त्याची कायदयानुसार विल्हेवाट लावणे. यात, कचरा गाडयांमध्ये भरणे/उतरविणे (Loding, Unloding) इ.कामांचा समावेश आहे. याकामी कुशल, अर्धकुशल कर्मचारी, आवश्यक यंत्रसामग्री, ट्रक इ.सह काम करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

7)सदरचे काम कार्यारंभ आदेश दिलेपासुन १५ दिवसांत पुर्ण करणे बंधनकारक आहे.

8)याकामी पुरविण्यात येणारे मनुष्यबळ सदर काम करण्यासाठी सक्षम असावे. तसेच यंत्रसामग्री वाहनासाठीचे चालक यांचेकडे अधिकृत परवाना (License)असणे आवश्यक आहे. 9) काम सुरु करण्यापुर्वी तसेच काम पुर्ण झाल्यानंतरचे फोटो काढून सादर करावे लागतील (Before & After)

10) या परिसरामध्ये काम करताना साप, धामण, नाग व इतर सरपटणारे प्राणी आढळण्याची शक्यता आहे. तरी, याकामी आवश्यक ते सुरक्षिततेचे उपाय योजणेत यावेत. तसेच, काम सुरु असताना एखादा सर्पमित्र सदर ठिकाणी उपलब्ध असणे आवश्यक. तसेच, काम करताना अशा प्रकारचे प्राणी आढळल्यास त्यांना सुरक्षितरित्या पकडून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडावे.

11) काम सुरु असताना कॉलेज मधील विद्यार्थ्यांची व इतर नागरिकांची सुरक्षितता महत्वाची आहे, याची जाणीव ठेऊन ठेकेदाराने काम करावे.

12) या वर्षीचा कडक उन्हाळा लक्षात घेता उष्माघातामुळे मजूर, कर्मचारी आजारी पडू नयेत यासाठी योग्य ते सुरक्षिततेच्या उपाय योजना कराव्यात०

13)सदरचे काम करताना, ७ जी झाडे/झुडपे तोडण्यासाठी म.न.पा ची परवानगी लागत नाही अशी झाडे/झुडपे व्यवस्थित तोडून सदर परिसर स्वच्छ करावा.

14)ठेकेदारास, राज्य शासन, केंद्र शासन यांचे प्रचिलत कायदे आणि नियम पाळणे बंधनकारक आहे. उदा. – किमान वेतन कायदा, Contract Labour Act etc.

15)सदर कच-याची विल्हेवाट कशी करणार याकामी अशाप्रकारचे काम करणा-या संस्थेंचे संमतीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

16)ठेकेदाराकडे राज्य शासन, केंद्र शासन, महानगरपालिका यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

17)ठेकेदारास अशा प्रकारच्या कामांचा ; किमान दोन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. याबाबतचे सक्षम अधिका-याच्या सहीचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

18) ठेकेदारास सूचित करणेत येते की त्यांनी सर्व परिसराची समक्ष पाहणी करुनच निविदा रक्कम रु. १,२५,०००/- भरावी. फक्त या निविदा नोटीशींमधील माहितीच्या आधारे ठेकेदाराने चूकीची रक्कम भरल्यास त्यास शासकीय तंत्रनिकेतन, पुणे जबाबदार राहणार नाही.

19)याकामाची निविदा रक्कम चार पैकी प्रत्येक परीसरास एकवट (Lump Sum) पध्दतीने केंद्र शासन, राज्य शासनाच्या प्रचलित करांसह भरणेची आहे. (including all the Taxes)

20)याकामाची बयाणा रक्कम (Earnest Money Deposit) रु.३,०००/- चा धनाकर्ष (Demand Draft) सोबत सादर करणेचा आहे. यशस्वी ठेकेदाराने कामाचे आदेश दिल्यानंतरही काम करण्यास नकार दिल्यास तर सदरची बयाणा रक्कम जप्त करणेत येईल. यशस्वी ठेकेदाराची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत रक्कमेत परावर्तीत करण्यात येईल. याव्यतिरिक्त सदर ठेकेदाराने रु. ३,०००/- चा अतिरिक्त धनाकर्ष सुरक्षा

अनामत म्हणून सादर करणेचा आहे. उर्वरित ठेकेदारांची बयाणा रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर परत करण्यात येईल.

21)कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ठेकेदाराने काम त्वरीत सुरु करणेचे आहे. प्रत्यक्ष होणा-या कामाच्या प्रमाणात (in proprotion)देयक अदा करणेत येईल./ काम सर्वंकष पुर्ण झाल्यानंतर तपासणी करुन देयक अदा करणेत येईल)

22)काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर सुरक्षा अनामत परत करण्यात येईल.

23)ठेकेदाराकडे GST नंबर असणे आवश्यक आहे.

24)कोणतीही निविदा स्विकृत करण्याचे अथवा फेटाळण्याचे, कोणत्याही स्तरावर निविदा स्थगित करण्याचे अथवा निविदा कार्यवाही रद्द करण्याचे अधिकार मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, पुणे १६ यांचे राहतील.

25)ठेकेदारांनी निविदा रक्कम विहीत नमुन्यामध्ये भरुन लखोटा बंद पाकीटात या कार्यालयात सादर करणेचे आहे.

26)ई-मेल द्वारे निविदा स्विकारली जाणार नाही.

27)ठेकेदाराने सादर केलेली निविदा ४५ दिवसांसाठी ग्राह्य धरणेत येईल. तसेच, काही कारणांमुळे उशीर झाल्यामुळे, विभागाने पत्र दिल्यानंतर ठेकेदाराने ग्राह्यता कालावधी वाढवून देण्यात यावा.

28)तसेच, ठेकेदाराने (Underteking regarding payment of taxes) स्वाक्षरी करुन देणे आवश्यक आहे.

29)ठेकेदाराने विषयांकीत काम करताना सर्व सुरक्षिततेचे नियम (Sefety measures) पाळणे आवश्यक आहे. सदरचे काम करत असताना सर्व मनुष्यबळ तसेच यंत्र सामग्री, वाहने यांचा विमा (Insurance) असणे आवश्यक आहे. याबाबत काही अपघात झाल्यास सदरची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

30) ठेकेदाराने वर उल्लेख केल्याव्यतिरिक्त खालील कायदयांचे पालन करणे आवश्यक राहील.

a)Payment of Wages Act 1936

b)Minimum Wages Act 1948

c)Employers Liability Act 1938

d)The Workmen's Compensation Act 1923

e)Motor Vehicle Act 1988

f)Contract Labour ( Regulation & Abolition) Act 1973

g)Solid Waste Management Act

h)Prohibition of Manual Scavenging Act

i)Any Other Laws applicable

उपरोक्त कायदयांमध्ये वेळोवेळी केलेल्या / करण्यात येणा-या सुधारणा ठेकेदारांवर बंधनकारक राहतील.

सदर कामासाठी संपर्क साधण्याच्या व्यक्तीचे नाव - श्री. विश्वनाथ गणपत तांबे

संपर्क क्रमांक (मोबाईल क्र) - +919423260675

| | |
|---|---|
| निविदा लखोटाबंद पाकीटात सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १२/०६/२०२३<br>दूपारी ३.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | शक्यतो, त्याचदिवशी म्हणजे<br>दिनांक १२ /०६/२०२३<br>दूपारी ४.०० वाजता |
| कामाची मुदत | १५ दिवस |

सोबत –

1) Underteking चा नमुना

2) ठेकेदाराने द्यावयाच्या पत्राचा नमुना

30/5/2023

(डॉ.विठ्ठल बांदल)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे १६

## ठेकेदाराने द्यावयाच्या पत्राचा नमुना

(Letter Head)

जावक क्रमांक ______________________________ दिनांक -   /   /२०२३

प्रति
मा.प्राचार्य
शासकीय तंत्र निकेतन
पुणे ४११०१६

**विषय - शासकीय तंत्र निकेतन, पुणे ४११०१६ या संस्थेच्या सर्व जमिनींवरील कचरा उचलून त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावणे.**

संदर्भ – निविदा नोटीस क्रमांक ................................, दिनांक   /   /२०२३

महोदय,

संदर्भिय निविदा नोटीशीचे अनुषंगाने उपरोक्त विषयांकीत काम करण्यासाठी मी अनुभवी व सक्षम असुन सदरचे काम करण्यास मी इच्छुक असुन निविदा नोटीशीमध्ये नमूद केलेप्रमाणे खालील कागदपत्रे मी या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे.

०१) राज्य शासन / केंद्र शासन / महानगरपालिका नोंदणी परवाना (सत्यप्रत)

०२) दोन वर्षे अनुभवाचा दाखला (सत्यप्रत)

०३) Underteking regarding payment of taxes.

०४) घनकचरा प्रक्रिया केंद्राचे संमतीपत्र तसेच, निविदा नोटीशीमध्ये नमूद केल्यानुसार सर्व परिसराची पाहणी केली असुन कामाचा आवाका ;बवचमद्ध जाणून घेऊनच निविदा भरत आहे.

०५) रु. ३०००/- च्या धनकर्ष क्रं. ------------ दि. -----/-----/ २०२३

| | |
|---|---|
| निविदा रक्कम – | रु. |

(सदर निविदा रक्कम ही केंद्र शासन, राज्य शासन यांचे सर्व करांसहीत आहे)

निविदा नोटीशीमधील सर्व अटी शर्ती मला मान्य आहेत.

आपला विश्वासू

सही -

नाव -

कंपनीचा शिक्का –

## Undertaking Regarding Payment of Taxes

( To be provided on Plain Paper)

**Undertaking**

**Undertaking regarding responsibility of payment of taxes**

- **Company Name** -
- **Tender No.** --

This is to certify that, we (Name of Company) hereby undertake the responsibility regarding employee's provident fund and miscellaneous provision Act 1952, the contract labour (Regulation & Abolition) Act 1970 and goods and service tax Act 2017 if we are awarded the work for the above mentioned Tender No. from Government Polytechnic, Pune 16

04) **Employee's Provident Fund & Miscellaneous Provision Act 1952** – All the provisions under this act are known to our company regarding provision for provident fund for each employee deployed for said Tender Work as per the provision of the Act. The responsibility the depositing the Provident Fund shall be Company's and the true copy of the paid Provident Fund Challan will be submitted to Government Polytechnic, Pune 16 We indemnify Government Polytechnic, Pune 16 against any disciplinary action or financial implications related to any provision of this act for the said work. Any document regarding Provident Fund requested by Government Polytechnic, Pune 16 shall be made available by the company.

05) **The contract labour (Regulation & Abolition) Act 1970** – All the provisions under this act are known to our company. According to the provision of the Act, if it is required for the said work to be registered under the said Act, then our company shall be responsible for getting it self registered under this act. We indemnify Government Polytechnic, Pune 16 against any disciplinary action of financial implications related to any provision of this act for the said work . Any document required under the Act, if requested by the Government Polytechnic, Pune 16 shall be made available by the company.

06) **Goods and service Tax Act 2017** – Along with its amendmends are known to our company. The responsibility of depositing the G.S.T shall be of the company. We indemnify the Government Polytechnic, Pune 16 against any disciplinary action or financial implications related to any provision of this Act for the said work. Any document regarding G.S.T. if requested by the Government Polytechnic, Pune 16 shall be made available by the company.

I, undersigned, Certify that to the best of my knowledge and belief, the above information provided is true.

Name of the Authorised Representative : ....................................

Designation of Authorised Representative : ....................................

Signature of Authorised Representative : ....................................

Seal of Company :

Dated : - / /

Place :